॥कर्दळीवन॥ सेवा संघ आयोजित

कलियुगातील एकमेव

# विश्वरुपदर्शन पालखी परिक्रमा

## २ ते ४ मे २०२०




**भीमा नदीच्या किनाऱ्याने पालखी बरोबर परिक्रमा**

पालखी परिक्रमेची अद्भुत, विलक्षण, रोमांचक अनुभूती...

* गाणगापूर अष्ट तीर्थ दर्शन
* सामूहिक अभिषेक
* आभिषेक केशर गंध कुपी
* अक्कलकोट सह

**पायी चालणे सुमारे १८ किमी - वाहनानेही करता येईल**

**पुणे ते पुणे – एसी वाहन प्रवास**

**निवासासाठी भक्तनिवास रुममध्ये व्यवस्था**

**सहयोग राशी रु. ६०००/– + GST 5%**

सर्व माहिती, वेळापत्रक व ऑनलाईन नोंदणी–www.kardaliwan.com/vishwaroop


**मर्यादित जागा ... त्वरीत नोंदणी करा...**

कर्दळीवन सेवा संघ, पुणे ६२२, जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, झेड ब्रिज जवळ, डेक्कन जिमखाना, पुणे – ०४

मो: 9657709678 / 9371102439 व्हॉटस्ॲप : 7057617018

फोन: 020-25534601 / 25530371 ईमेल : swami@kardaliwan.com

# विश्वरूपदर्शन पालखी परिक्रमा



श्रीकृष्ण अवतारामध्ये बालपणी गोकुळामध्ये असताना बाळकृष्णाने यशोदा मातेला विश्वरूप दर्शन घडविले होते. लोणी चोरल्याचा आळ गोपिकांनी केल्यावर यशोदा माता बाळकृष्णावर रागवली होती. राग लटका होता... मात्र जेव्हा तिने त्याला तोंड उघडायची आज्ञा केली तेव्ही ती अवाक् झाली. लोण्याऐवजी तिला श्रीकृष्णाच्या मुखामध्ये विश्वरूपाचे अद्‌भुत आणि विलक्षण असे दर्शन झाले. तिला भोवळ आली. खरे खोटे काही कळेना. शेवटी बाळकृष्णाने ते रूप आवरून घेतले. नंतर भानावर आल्यावर यशोदा मातेने पाहिले तर बाळकृष्ण तिच्याकडे बघून खुदूखुदू हसत होता... यानंतरचा दुसरा प्रसंग म्हणजे कुरुक्षेत्रावरचा प्रसंग होय. महाभारत युद्धाला अजून प्रारंभ झाला नव्हता आणि अर्जुन इतका गोंधळला होता की त्याला युद्ध करावे की करू नये असा मोठा संभ्रम झाला होता. अशावेळी श्रीकृष्ण भगवंताने त्याला भर रणांगणावर जो उपदेश केला तो भगवद्‌गीता म्हणून प्रसिद्ध आहे. गीता सांगूनही जेव्हा अर्जुन ताळ्यावर येईना तेव्हा श्रीकृष्णाने त्याला आपल्या विश्वरूपाचे दर्शन घडविले. एकाचवेळी संपूर्ण ब्रह्मांडाचे अर्जुनाला दर्शन झाले. अक्राळविक्राळ असा काळाचा चेहरा त्याने पाहिला. जन्म आणि मृत्यू, निर्मिती आणि नाश हा सृष्टीचा खेळ त्याने पाहिला. संपूर्ण विश्व हे श्रीकृष्णरूपच असल्याचे त्याला दिसू लागले. जळी, स्थळी सर्वत्र श्रीकृष्णच दिसू लागला. श्रीकृष्णच सर्वांना जन्म देत आहे, त्यांचे पालन–पोषण करीत आहे आणि त्यांचा मृत्यूही श्रीकृष्णच घडवून आणत आहे, असे विश्वरूप दृश्य अर्जुनाने पाहिले. ते विश्वरूप दर्शन पाहून तो धन्य झाला आणि भयभीतही झाला. त्याने श्रीकृष्णाच्या चरणांशी लोळण घेतली आहे. आपले विश्वरूप दर्शन आवरून घेण्याची विनंती केली. तेव्हा अर्जुनाच्या लक्षात आले की आपण फक्त निमित्तमात्र आहोत. प्रत्यक्ष सगळी श्रीकृष्णांचीच लीला आहे. अर्जुनाचा संभ्रम दूर झाला आणि त्याने युद्धाला सुरुवात केली.

**वरील दोन्ही प्रसंग द्वापारयुगातील आहेत.** वेद, उपनिषदे, स्मृती, श्रृती, पुराण यांचा धांडोळा घेतला तर आपल्या लक्षात येते की वरील दोन घटनांनंतर **कलियुगामध्ये १३व्या शतकात पुन्हा विश्वरूप दर्शनाचा प्रसंग घडला आहे.** याचा अर्थ संपूर्ण इतिहासात फक्त तीनदा आणि कलियुगात फक्त एकदाच विश्वरूप दर्शनाची घटना घडली आहे. श्रीगुरुचरित्र हा दत्तसंप्रदायाचा आधारभूत ग्रंथ आहे. त्याला पाचवा वेद अशी मान्यता आहे. या गुरुचरित्रामध्ये कलियुगातील एकमेव विश्वरूप दर्शन प्रसंगाचे वर्णन आलेले आहे. श्रीदत्तात्रेयांचे कलियुगातील दुसरे अवतार नृसिंह सरस्वती स्वामी यांनी गाणगापूर येथे २८ वर्षे वास्तव्य केले आणि नंतर ते श्रीशैल्य जवळील कर्दळीवनामध्ये गुप्त झाले. त्यांचा जन्म कारंजानगरीमध्ये (सध्याचे लाडाचे कारंजे) झाला. संपूर्ण भारतवर्षात त्यांनी भ्रमण केले. औदुंबर, नृसिंहवाडी, परळी वैजनाथ, बासर इ. ठिकाणी वास्तव्य केले आणि शेवटी ते गाणगापुरात येऊन राहिले. गाणगापूर येथे हळूहळू त्यांच्या दैवी लीलांची चर्चा होऊ लागली आणि त्यांचा प्रभाव वाढू लागला. हजारो आर्त, जिज्ञासू आणि भाविक भक्तांचा त्यांच्या दर्शनासाठी ओघ सुरू झाला.

यादरम्यान गाणगापूर जवळच १२ मैल अंतरावर एका खेडेगावामध्ये त्रिविक्रमभारती या नावाचे एक योगी सत्पुरुष राहत होते. त्यांनी खूप तपश्चर्या केली होती. त्यांची दैनंदिन साधना खूप तीव्र होती. ते उग्र नृसिंह भगवंताची उपासना करीत असत. त्यांचा अधिकार इतका मोठा होता की त्यांच्या रोजच्या मानसपूजेमध्ये साक्षात नृसिंह भगवंत उपस्थित होऊन दर्शन देत असत. त्रिविक्रम

भारती यांच्या कानावर नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांची आणि त्यांच्या गाणगापूर मधील दैवी लीलांची माहिती पडली. तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले. प्रजेपासून राजापर्यंत सर्वजण त्यांच्या सेवेत मग्न आहेत याचा त्यांना अचंबा वाटला. एका संन्याशाला कशाला हवा एवढा थाटमाट असा विचार त्यांच्या मनात आला. काही लोकांसमोर त्यांनी तसे बोलूनही दाखवले.

ही बातमी नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांना कळली. त्यांनी त्रिविक्रम भारती यांची भेट घ्यायचे ठरवले. त्यांनी राजाला पालखीची सोय करायला सांगितली आणि हत्ती, घोडे, सैनिक, पायदळ, ढोल ताशे, नौबती असा मोठा लवाजमा घेऊन मोठ्या थाटामाटाने ते त्रिविक्रम भारती यांची भेट घेण्यासाठी भीमा नदीच्या काठाकाठाने गाणगापूरहून निघाले. त्या दिवशी वैशाख शुद्ध दशमी होती. इकडे त्रिविक्रम भारती त्या दिवशी सकाळी पूजा करायला बसले. पण काही केल्या नृसिंह भगवान त्यादिवशी मानसपूजेमध्ये प्रकट होईनात. त्यांना कळेना आपल्याकडून आज काय चूक घडली. यापूर्वी असे कधीही घडलेले नव्हते. त्यांचे चित्त थाऱ्यावर राहीना. त्यांचे मन डळमळीत झाले. शेवटी ते पूजा अर्धवट टाकून घराबाहेर आले. तेव्हा त्यांना दूरवरून पालखी येताना दिसली. पालखी बरोबर हत्ती, घोडे, नौबती असा थाटमाट बघून कोण येत आहे असा विचार त्यांच्या मनात आला. त्याचवेळी तो पालखी त्यांच्याच दिशेने येताना त्यांना दिसली. त्यांनी नीट नीरखून पाहिले तर त्यांना पालखीमध्ये साक्षात भगवान नृसिंहाचे दर्शन झाले. प्रत्यक्ष आराध्य दैवत सगुण रूपात समोर पाहून त्यांना धक्का बसला. त्यांनी नंतर पालखीच्या भोयांकडे पाहिले. तेथेही त्यानंतर नृसिंह भगवंत दिसू लागले. नंतर त्यांचे लक्ष पायदळ, घोडदळ, माहूत आणि मिरवणुकीतील इतर लोकांकडे गेले तेव्हा त्यांना सर्वत्र नृसिंह भगवानच दिसू लागले. त्रिविक्रम भारती अत्यंत सद्गदीत झाले. त्यांचा दंभ नाहीसा झाला. त्यांनी तात्काळ भूमीवर लोळण घेतली. श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांकडे कृपेची याचना केली. तेव्हा स्वामींनी त्यांना विश्वरूप दर्शन दिले. त्यावेळी चराचरामध्ये श्री नृसिंह सरस्वती स्वामी व्यापून असल्याचे त्रिविक्रम भारती यांना दिसले. त्यांनी साश्रू नयनांनी शरणागत होऊन आपले विश्वरूप आवरून घेण्याची प्रार्थना स्वामींना केली. स्वामीजींनी आपले विश्वरूप दर्शन आवरून घेतले. त्यावेळी स्वामींच्या पादुका तेथे उमटल्या. त्यांना विश्वरूप दर्शन पादुका असे म्हणतात. त्रिविक्रम भारतीयांनी स्वामींची पाद्यपूजा केली. त्यांना भिक्षा ग्रहण करण्याची विनंती केली. त्यानंतर हर तऱ्हेने स्वामींची सेवा केली. तेव्हापासून त्रिविक्रम भारती स्वामींचे शिष्य बनले.

विश्वरूप दर्शन प्रसंगाची आठवण म्हणून वैशाख शुद्ध दशमीला पहाटे काकड आरती झाल्यावर गाणगापूर येथून नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांची पालखी सर्व लवाजम्यासह मिरवणुकीने निघते आणि त्रिविक्रम भारती यांच्या गावी जाते. यालाच विश्वरूप दर्शन परिक्रमा असे म्हणतात. माध्यान्य काळी दुपारी १२च्या सुमारास तेथे पालखी पोहोचते. महाप्रसाद होतो. विविध सेवा सादर होतात. संगीत सेवाही होते. त्यानंतर स्वामी पुन्हा गाणगापूर येथे परत येतात. विश्वरूप दर्शन पालखी परिक्रमा सुमारे १८ किमी एवढे अंतर पायी कापून पूर्ण होते. परत येताना वाहनाने परत येतात. पालखी परिक्रमेचा अनुभव अद्‌भुत आणि अविस्मरणीय असतो. पालखी बरोबर आपल्याला चालावे लागते. पालखीला स्पर्श करता येतो. पालखी खांद्यावर घेता येते.

कर्दळीवन सेवा संघाने प्रथमच विश्वरूपदर्शन पालखी परिक्रमा आयोजित केली आहे. ही एक वेगळी परिक्रमा आहे. ज्यांना शक्य आहे त्यांनी चालत करावी. इतरांनी वाहनाने जावे. एका अद्‌भुत प्रसंगाचे आपण साक्षीदार होतो हा अनुभव रोमांचित करणारा आहे. प्रत्येक दत्त भक्ताने, स्वामी भक्ताने आयुष्यात एकदा तरी विश्वरूप दर्शन पालखी परिक्रमेची अनुभूती घ्यावी.

## नोंदणी कशी करावी?...

१. विश्वरूपदर्शन पालखी परिक्रमा : पुणे ते पुणे अशी आहे. पुण्यातून सहभागी व्हावे लागेल.

२. सोबतचा परिक्रमा नोंदणी अर्ज भरून त्याला एक फोटो आणि आधारकार्डाची झेरॉक्स प्रत आणि शुल्काची रक्कम आमच्या कार्यालयात रोखीने, चेकने किंवा आमच्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या खात्यावर रोखीने, चेकने, ऑनलाईन **NEFT** ट्रान्सफर करुन भरता येईल. तसेच कुरियरने पाठवता येईल. **ऑनलाईन नोंदणीसाठी www.kardaliwan.com/vishwaroop** भेट द्या.

३. परिक्रमेसाठी मर्यादित जागा उपलब्ध असल्यामुळे **''प्रथम नोंदणी प्रथम प्रवेश''** या तत्त्वावर नाव नोंदणी सुरू आहे. **नोंदणी करताना सर्व रक्कम रु. ६३००/- एवढी भरावी लागेल.**

# विश्वरूपदर्शन पालखी परिक्रमेसाठी व्यवस्था सेवा सहयोग राशी
# ₹ ६०००/- + (जीएसटी ५% - ₹ ३००/- ) = ₹ ६३००/- प्रति व्यक्ती

**बँक खात्याची माहिती**

**खात्याचे नाव :- दत्त कर्दळीवन परिक्रमा संघ (Datta Kardaliwan Parikrama Sangh)**

**बँकेचे नाव :- बँक ऑफ महाराष्ट्र, डेक्कन जिमखाना पुणे शाखा,**

**चालू खाते क्र. 60181419765** **IFSC Code : MAHB00000033**

## परिक्रमा नियोजित कार्यक्रम - पुणे ते पुणे

२ मे २०२० : सकाळी ७ वाजता शंकर महाराज मठ येथून प्रस्थान. रस्त्यामध्ये सोलापूरजवळ भोजन. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत गाणगापूर येथे आगमन, मंदिर दर्शन, भोजन, मुक्काम.

३ मे २०२० : पहाटे ३ वाजता काकड आरती करून पालखी परिक्रमेला सुरुवात. दुपारी १२ वाजता पालखी मुक्कामी आगमन. दर्शन, महाप्रसाद, संध्याकाळी ६ वाजता वाहनाने गाणगापूरकडे प्रयाण.

४ मे २०२० : सकाळी ८ ते १० - अष्टतीर्थ दर्शन - सामूहिक अभिषेक १२ वाजता अक्कलकोटकडे प्रयाण.
अक्कलकोट दर्शन - पुण्याकडे प्रयाण - रस्त्यामध्ये भोजन - रात्री ११ वाजेपर्यंत पुण्यात आगमन
यात्रा समाप्त

## विश्वरूपदर्शन पालखी परिक्रमेसाठीची व्यवस्था

१) विश्वरूपदर्शन पालखी परिक्रमा एसी पुशबॅक सीटच्या वाहनाने (उदा. टेम्पो ट्रॅव्हलर किंवा ३२/४५ सीटर बस इ.) केली जाईल. परिक्रमेला येणाऱ्या भक्तांची संख्येनुसार प्रथम नोंदणी करणाऱ्यांना प्रथम सीट दिली जाईल.

२) परिक्रमेमध्ये चहा, नाश्ता, भोजन व्यवस्था (शाकाहारी) करण्यात आली आहे. राहण्यासाठी भक्तनिवास रुममध्ये व्यवस्था आहे. गादी, उशी, पांघरुण अशी व्यवस्था आहे. महिला आणि पुरुषांची स्वतंत्र व्यवस्था आहे. एका रुममध्ये २ किंवा चार व्यक्ती राहतील.

३) स्वत:चे कपडे एक अंगावर-अधिक १ जोड, रात्री झोपताना लागणारे कपडे, चादर बरोबर घ्यावेत. नेहमी लागणारी औषधे, इतर वस्तू आपल्या बरोबर घ्याव्यात. ज्यांना वेळेवर औषधे घ्यावी लागतात आणि त्याआधी खावे लागते, अशा व्यक्तींनी त्यासाठी सुके खाद्य पदार्थ स्वत:बरोबर घ्यावेत.

४) परिक्रमेदरम्यान काही प्रमाणात गैरसोयी व्हायची शक्यता आहे. ज्यांना ॲडजेस्ट होणे शक्य असेल त्यांनीच या परिक्रमेमध्ये सहभागी व्हावे, ही विनंती. कर्दळीवन सेवा संघ म्हणजे ट्रॅव्हल एजन्सी किंवा फॅसिलिटी/सर्व्हिस प्रोव्हायडर नाही. ज्यांना विश्वरूपदर्शन पालखी परिक्रमा करायची तीव्र इच्छा आहे, त्यांचेसाठी सेवा भावनेने आम्ही हे कार्य करीत आहोत. त्यामुळे परिक्रमेची फी भरली आहे, आता आम्हाला सर्व लिहिलेल्या सुविधा पुरवायलाच हव्यात, असा आग्रह धरता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती. परिक्रमेदरम्यान आधी विहित केलेली एखादी कृती काही अपरिहार्य कारणामुळे रद्द झाल्यास कोणताही परतावा मिळणार नाही.

५) आपल्याला परिक्रमेसंबंधी ज्या काही सूचना करायच्या असतील त्या परिक्रमा संपल्यावर लेखी स्वरूपात कराव्यात. परिक्रमेची सर्व माहिती नोंदणी अगोदरच करुन घ्यावी ही विनंती. ऐनवेळी परिस्थितीनुरूप परिक्रमेच्या कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार कर्दळीवन सेवा संघाने राखून ठेवलेला आहे, याची नोंद घ्यावी. कोणतीही माहिती, शंका, अडचण विनासंकोच, मोकळेपणाने आणि प्रांजळपणे आधीच विचारून आणि समजून घ्यावी. मनाचे समाधान झाल्यावरच परिक्रमेसाठी नावनोंदणी करावी ही विनंती.

६) सर्व प्रकारच्या तक्रारी, दावे यासाठी न्यायालयीन प्रक्रियेची सीमा, पुणे शहर न्यायालयीन क्षेत्र हे राहील.